नियमित वाचा, दिव्य वार्ता.... www.divyawarta.com वर

# दिव्य वार्ता

रमजान मुबारक

आजचा इफ्तार ६.४० मि.
उद्याची सहेर ५.१३ मि.

वर्ष १० वे विषेश अंक RNI.N0.MAHMAR/2013/51443 पोस्टल क्रं 175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- शुक्रवार दि.१५ मार्च २०२४ पाने ४ किंमत ३

# बीडसाठी शरद पवार मास्टरस्ट्रोकच्या तयारीत?
# तगडा चेहरा उतरविणार रिंगणात



**बीड । दिव्य न्युज**

**बीड लोकसभा मतदारसंघातून भाजपने सलग दोनदा खासदार राहिलेल्या डॉ. प्रीतम मुंडे यांना डावलून भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांना रिंगणात उतरविण्याचा निर्णय घेतला आहे. आता ज्येष्ठ नेते शरद पवार देखील बीडच्या जागेबाबत मास्टरस्ट्रोक खेळण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.दोनच महिन्यांपूर्वी परळीमध्ये पंकजा मुंडे यांनी आपण बहिणीच्या जागेवर लोकसभा लढविणार नाही, असे जाहीर कार्यक्रमात सांगितले होते. तर, बीडला झालेल्या महायुतीच्या मित्रपक्ष संमेलनात भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम आशा सर्वच पक्षांतील नेत्यांनी प्रीतम मुंडे यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ टाकून त्या खासदारकीची हॅट्रीक करणार अशी घोषणा केली होती.**

प्रीतम मुंडेनीदेखील आपण सर्व नेत्यांच्या आग्रहाचा सन्मान करत असल्याचे सांगत त्या दृष्टीने परवापर्यंत आपली वाटचाल सुरू ठेवली. मात्र, बीड लोकसभेसाठी पंकजा मुंडेंना रिंगणात उतरले आहे. आता त्यांच्या तोडीचा उमेदवार देण्यासाठी शरद पवारांनीदेखील व्यूव्हरचना आखली आहे. सत्ताधाऱ्यांबद्दलची नाराजी, आरक्षण आंदोलनामुळे मराठा समाजात असलेली धग आणि इतर मुद्द्यांचा लाभ उठू शकणारा व जिल्हाभरात स्वतंत्र ओळख आहे, असा चेहरा पवारांच्या राष्ट्रवादीकडून शोधला जात आहे. या पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी काही प्रमुख नेत्यांना संपर्कदेखील साधल्याचे सूत्रांची माहिती आहे. यात प्रामुख्याने शिवसंग्रामच्या डॉ. ज्योती विनायक मेटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे बजरंग सोनवणे, आरक्षण आंदोलन आणि सामाजिक चळवळीत काम करणारे बी. बी. जाधव आणि माजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांची नावे आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादीकडून माजी मंत्री जयसिंग गायकवाड, डॉ. नरेंद्र काळे, प्रा. सुशीला मोराळे, ईश्वर मुंडे आदी नेते तयारी करत आहेत. त्यांचे भेटीगाठींचे सत्र सुरूच आहे. पक्षाऐवजी बाहेरचा चेहरा रिंगणात उतरवायचा व पक्षाची ताकद मागे उभी करायची असे गणित शरद पवारांच्या राष्ट्रवादीत मांडले जात आहे. डॉ. ज्योती मेटे यांचा शिवसंग्राम पक्ष जरी महायुतीत असला तरी अलीकडे महायुतीत छोट्या घटक पक्षांना दुय्यमच वागणूक आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून डॉ. ज्योती मेटे यांना विचारणा करण्यात आली आहे. डॉ. मेटे यांचे पती दिवंगत लोकनेते विनायक मेटे यांनी आपल्या सार्वजनिक आयुष्यात मराठा समाजाचे आरक्षण, मुस्लिम समाजाचे आरक्षण, धनगर आरक्षण या मुद्द्यासह सामाजिक चळवळीत कायम सक्रिय सहभाग घेतला. त्यांचा मृत्यूदेखील मराठा समाजाच्या आरक्षण बैठकीला जाताना वाहन अपघातात झालेला आहे. इतर सर्वच समाजात दिवंगत मेटेबद्दल असलेला आदर व सहानुभूती याचा फायदा डॉ. ज्योती मेटे यांना होऊ शकतो.

दुसरे नाव म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसमधीलच बजरंग सोनवणे. दोन साखर कारखाने चालविणारे बजरंग सोनवणे यांनी मागच्या वेळेस भाजपच्या डॉ. प्रीतम मुंडे यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. त्यामुळे त्यांचीही जिल्हाभर ओळख आहे. निवडणूक लढविण्याचे तंत्र, यंत्रणा वापरण्याची क्षमता या बाबीमुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून बजरंग सोनवणे यांनादेखील विचारणा झाल्याची माहिती आहे.

तिसरे नाव म्हणजे आरक्षण आंदोलन आणि सामाजिक चळवळीत काम करणारे व जिल्ह्यातील सनदी लेखापाल बी. बी. जाधव यांचे नावदेखील चर्चेत आहे. राष्ट्रवादीतीलच काही नेत्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार व बी. बी. जाधव यांची भेट घालून दिल्याचीदेखील माहिती आहे. सामाजिक चळवळीत काम करण्यामुळे त्यांचीदेखील जिल्हाभरात ओळख आहे. तसेच यशस्वी उद्योजक असल्याने या घटकातदेखील त्यांचा चांगले वजन आहे. त्याचा पक्षाला फायदा होईल, अशी गणिते मांडली जात आहेत. त्यामुळे बी. बी. जाधव यांच्याबाबत दोन्ही गटांकडून समान बोलणी सुरू असल्याची माहिती आहे.

चौथे नाव म्हणजे माजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांचे आहे. आरोग्य खात्यात नोकरीला असले तरी डॉ. थोरात यांचा राजकीय वावर बऱ्यापैकी आहे. त्यांनी दिवंगत लोकनेत्या डॉ. विमल मुंदडा यांचे खासगी सचिव म्हणून काम केले आहे. दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे व पंकजा मुंडे यांचे निकटवर्तीय अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या भावजय जिल्हा परिषद सदस्या आहेत. आता या पक्षाबाहेरील चार नेत्यांपैकी कोणाला उमेदवारी मिळते का पक्षातून उमेदवारीसाठी स्पर्धेत असलेल्या माजी मंत्री जयसिंग गायकवाड, डॉ. नरेंद्र काळे, प्रा. सुशीला मोराळे, ईश्वर मुंडे, गंगाभीषण थावरे यांच्यापैकी कोणाला उमेदवारी मिळते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## लोकसभा निवडणूकीसाठी जिल्हा प्रशासन गतीने लागले कामाला, अचारसंहितेत जिल्हाधिकाऱ्यांचे राहणार बारीक लक्ष,

### निवडणूकीच्या पुर्व तयारीच्या अनुषंगाने विविध विषयाकडे कार्यशाळेतून दिपा मुधोळ यांनी अधिकार्यांचे वेधले लक्ष

बीड,/दिव्य न्युज

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पूर्वतयारी अनुषंगाने गुरूवारी बीड ३९ लोकसभा मतदारसंघ कार्यक्षेत्रासाठी आवश्यक असणार्या बाबींवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. अंतर्गत निवडणूक खर्चाची जिल्हा दरसूची निश्चित करने, माध्यम प्रमाणिकरण आणि सनियंत्रण समिती, मतदान दिवस व्यवस्थापन, ईव्हीएम मशीन हाताळणी या विषयावरील प्रत्यक्ष सादरीकरणाद्वारे प्रशिक्षण संपन्न झाले. या प्रशिक्षण कार्यशाळेत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे, अपर जिल्हाधिकारी डॉक्टर त्रिगुण कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच निवडणुकीच्या धर्तीवर नियुक्त झालेले अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मुख्य लेखा वित्त अधिकारी सुरेश केंद्रे यांनी निवडणुकीदरम्यान उमेदवाराद्वारे केला जाणारा खर्च, त्याचे ताळेबंद शासनाच्या समोर सादर करणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसे न केल्यास कायदेशीर पद्धतीने कारवाई करण्याचे नियम असल्याचेही लक्षात आणून दिले. निवडणुकीमध्ये उभे असलेले उमेदवारांनी स्वतंत्र खाते उघडून या मध्ये भारतीय निवडणूक आयोगाने ठरविलेली रक्कम ९५ लाख जमा करून त्या पद्धतीने तेवढा खर्च किंवा त्यापेक्षा कमी खर्चाचे लेखाजोखा निवडणुकीच्या दिवसापर्यंत मांडणे आवश्यक असल्याचे सांगितले. यानंतर प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे निमसरकर यांनी माध्यम प्रमानिकरण आणि सनियंत्रण समिती निवडणुकीच्या दरम्यान काय काम करते याबद्दलचे सादरीकरण केले. या अंतर्गत मुद्रित माध्यमातून तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित केल्या जाणार्या बातम्या माहिती कुठल्याही एका उमेदवाराला प्रोत्साहन देणारी आणि दुसर्या उमेदवाराला नकारात्मकता दर्शविणारी नसावी असे सांगितले. तसेच माध्यम प्रतिनिधींनी वस्तुनिष्ठ पद्धतीने वार्तांकन करावे , तसे न केल्यास निवडणुकीला प्रभावित करणार्या नियमाखाली कठोर कारवाईचे निर्देश असल्याची माहिती दिली. निवडणुकीच्या ४८ तासा आधी आणि नंतर घ्यावयाची काळजी याबाबतही माहिती दिली. उपविभागीय अधिकारी दीपक व जाळे यांनी मतदानाच्या दिवशीची व्यवस्थापन कशा पद्धतीने करावे याबद्दलची सविस्तर माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून दिली. मतदानाच्या दिवशी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदार केंद्रात मतदान सुरू होण्याच्या दीड तासा आधी पोहोचून पोलींग बुथवर एकूण कामाची पाहाणी करून खातरजमा करावी. एकूण निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाच्या गोष्टीवर त्यांनी भर दिला जसे प्रत्येका पोलिंग बूथवर मेडिकल अधिकारी असावे अतिसंवेदशील मतदान क्षेत्रात अंधार पडण्याआधी घ्यावयाची काळजी, दिव्यांग, वृद्ध यांनी करावयाच्या मतदानतील त्यांच्या सहाय्यकाची भूमिका, मतदान झाल्यानंतर ईव्हीएम मशीन योग्य हाताळणे तसेच स्ट्राँग रूममध्ये येईपर्यंत घ्यावयाची काळजी याबाबत सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन केले.



## परळी येथील टोकवाडी रोडवर ट्रॅक्टरने मुलाला चिरडले !

परळी वै / दिव्य न्युज



परळी तालुक्यातील टोकवाडी रोडवर काल दिनांक १२ मार्च संध्याकाळी ५:३० च्या सुमारास चक्र४न८९३५ या ट्रॅक्टरने १५ वर्षीय सिद्दिक ताजोद्दीन शेख या मुलाला चिरडल्याची घटना घडली आहे. सूत्रांनी दिलेली माहिती नुसार सविस्तर बातमी अशी आहे की सिद्दिक ताजोद्दीन शेख हा मुलगा आपल्या आई वडिलांना भेटायला टोकवाडी शिवारातील एका विट भट्टीवर आला होता. रत्नेश्वर महाविद्यालय येथे दहावी चे शिक्षण घेत असुन तो टोकवाडी येथील समोरुन येणार्या ट्रॅक्टरने याला चिरडलं आहे. उपचारासाठी परळी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं नंतर डॉक्टरांनी याला मृत घोषित केल. सिद्दिक ताजोद्दीन शेख हा सध्या दहावीच्या बोर्डाच्या परीक्षा देत होता. या घटनेनंतर परळी उपजिल्हा रुग्णालयात मोठ्या संख्येने समाज बांधवांनी गर्दी केली होती.

## जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनात मुखिद लाला यांनी पाणी प्रश्न सोडवला



बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील पाणी प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे अनेक भागात पिण्याच्या पाण्या साठी आतापासूनच वणवण भटकंती सुरू झाली आहे

सध्या पवित्र रमजान महिना सुरू असल्या मुळे मुस्लिम भागात पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते परंतु शहरातील मोहमदिया कॉलोनी या भागात अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्या साठी पाईप लाईनच नसल्याने नागरिकांना दुसऱ्या ठिकाणावरून पाणी आणावे लागत असे या भागातील नागरिकांनी ही बाब जयदत्त अण्णा क्षीरसागर यांचे खंदे समर्थक नगरसेवक मुखिद लाला यांना कळवताच त्यांनी संबंधित ठिकाणी जात परिस्तिथी चा आढावा घेतला व बीड नगरपलिकेच्या मुख्याधिकारी आणि पाणी पुरवठा विभागात माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या माध्यमातून पाठपुरावा करत मोहमादिया कॉलोनी येथील तकी भाई किराणा दुकान ,सय्यद इलियास यांच्या दुकाना समोरील गल्ली,शेख बिलाल यांची गल्ली झिनुरेन मस्जिद जवळील भागाला अमृत अटक योजनेतून झालेल्या पाईप लाईन ची जोड देत या ठिकाणी पाईप लाईन करून दिली या वेळी परिसरातील नागरिकांनी जयदत्त अण्णा क्षीरसागर आणि नगरसेवक मुखिद लाला यांचे आभार व्यक्त केले पवित्र रमजान महिन्यात अनेकांचा पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न मार्गी लागल्याने मुखिद लाला यांनी गोर गरिबांचे आशीर्वाद कमावले असल्याची भावना नागरिक व्यक्त करू लागली आहेत



**बीड : बीड येथील जिल्हा न्यायालयात विधीतज्ञ म्हणून काम पाहणारे ॲड.यासेर पटेल यांना भारत सरकारच्या वतीने नोटरी म्हणून नियुक्ती केले आहे त्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करतांना शिवसेनेचे शहर प्रमुख शेख नजीम, माजी सभापती इलयास टेलर, शासकीय ठेकेदार पठाण साहाब, सुहाना सफर शुज सेंटरचे संचालक काजी अय्युब व संपादक मुहम्मद अबुबकर....**

# मोदींची गॅरंटी, राहुल यांची वॉरंटी!

## ओझर येथे काँग्रेस नेते जयराम रमेश यांचा भाजपवर हल्लाबोल

ओझर/दिव्य न्यूज जुबेर शेख

ओझर, ता. १४ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला गॅरंटी दिली असली तरी काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी वॉरंटी दिली आहे. केंद्र सरकारने दहा वर्षांत कृषी क्षेत्रासाठी काय केले, असा सवाल करीत काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी पतप्रधान नरेंद्र मोदी सरकारवर हल्लाबोल केला.

काँग्रेसच्या भारत जोडो न्याय यात्रेवेळी येथील श्री लॉन्स मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत जयराम रमेश बोलत होते. व्यासपीठावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, माजी आमदार अनिल कदम, डॉ. राजू वाघमारे तालुका उपाध्यक्ष हेमंत जाधव ओझर शहराध्यक्ष सुनिल बाफणा आदी उपस्थित होते.

जयराम रमेश म्हणाले, दिल्लीला रामलीला



मैदानावर शेतकरी परिषद घेतली तेव्हा काँग्रेसने चांदवड येथे शेतकरी परिषद घेतली. मणिपूर ते मुंबई दौरा करण्याचा मोदींनी जसा प्रयत्न केला होता त्याला प्रत्युत्तर म्हणून राहुल गांधींनी जनतेला पाच गॅरंटी दिल्या आहेत. भाजपने शेतकरीविरोधी धोरण आणून शेती व पुरक व्यवसाय उद्ध्वस्त केला आहे. केंद्रातील सरकार पायउतार होण्याची वेळ आली आहे, असा पुनरुच्चार करून शेतकऱ्यांच्या सद्य परिस्थितीवर उदाहरणासह भाजपाच्या सरकारवर त्यांनी हल्लाबोल केला. बाळासाहेब थोरात म्हणाले, नंदूरबारपासून सुरू झालेल्या न्याय यात्रेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. दुर्लक्षित वंचित समाज घटकांना गॅरंटी न्याय यात्रेच्या निमित्ताने खासदार राहुल गांधी देतात. २००४ ते २०१४ या काळात सोनिया गांधी यांनी युपीए सरकारमध्ये चांगले कार्य केले. नाना पटोले म्हणाले : २७ सप्टे २० मध्ये मोंदींनी दोन कायदे सुरू केले दिल्ली हरियाणा सिमेवरील शेतकरी आंदोलन केले ७०० शेतकरी शहीद झाले १९ नोव्हे २१ मोदींनी काळे कायदे मागे घेतले हा दिवस इंदिरा गांधींचा जन्मदिन होता हे मोदी विसरतात शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही हरियाना मध्ये शेतकरी मारले गेले त्यावेळी प्रधानमंत्री झुकले मात्र आज रामलिला मैंदानावर होणारे शेतकरी संमेलन व नासिकमध्ये होणारे राहूल गांधींचे संमेलन महत्वाचे ठरणार आहे चार गॅरंटी एमएसपी ला विशेष कायदा : शेती उद्योगाला रंगनाथ न लागू होणार . शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणे लासलगांव कांद्यासाठी महत्वाचा ठप्पा असल्याने आयात निर्यातची निती दिर्घकालीन होईल प्रधान मंत्री फसल योजना ही उद्योगपतींसाठीच फायदेशीर आहे त्याचा शेतकऱ्यांना काही उपयोग नाही ती फसवी आहे शेतकरी देशोधडीला लागला आहे कॉग्रेसच्या आगामी काळात फक्त शेतक ऱ्यांसाठीच तिचा फायदा होईल पाचवी गॅरंटी बाबत संशोधन करून शेतीसाठी जीएसटी लागू होणार नाही शेती प्रॉडक्ट हे विदाऊट जीएसटी करण्यात येईल आजची मोदी सरकारची एकच निती चंदा दातों का दाता अन्नदाताओं को सिर्फ न्योता प्रधानमंत्री बोलने में टॉपटॉप म्हणत होते परंतु त्यांची गॅरंटी ही भूलथाप आहे शेतकऱ्यांना चारपट मोबदला मिळायला पाहिजे यावेळी पत्रकार परिषदेत खालील प्रश्न विचारण्यात आले त्यास जयराम रमेश नाना पटोले यांनी समर्पक उत्तरे दिली प्रश्न : आताच्या सरकारची धोरणं कायम राहतील का उत्तर : शेतकऱ्यांच्या उत्पादनाशी सुसंगत धोरणं राबवण्यात येतील प्रश्नः संपूर्ण कर्ज माफी होईल का ७२ हजार कोटी मनमोहन सिंग यांच्या काळात शेतकऱ्यांवर कर्ज होते सोनिया गांधींनी २७ हजार कोटी कर्ज माफ केले हरित क्रांती शेत क्रांती क्राँग्रेसने केली

# दिव्य वार्ता



## उपळी येथील ग्रामसेवक सतत गैरहजर असल्याने नागरिकांची कामे राखळली-शेख एजाज यांनी दिले गटविकास अधिकारी यांना निवेदन

वडवणी / दिव्य न्युज

उपळी हे गाव जिल्हापरिषदेचे सर्कल असून लोखंसंख्या ही जास्त आहे. या गावात गेल्या महिनाभरापासून ग्रामसेवकांच्या गैरहजर असल्याने विचारणा केली असता ग्रामसेवकांची रजा असल्याचे समजले. या सर्व घटना गेल्या महिनाभरापासून घडत आहे त्यामुळे आम्ही वारंवार ग्रामसेवक द्या या मागणीसाठी पंचयायत समिती येथे गेलो परंतु आम्हाला तात्पुरता ग्रामसेवकही मिळत नाही त्यामुळे गेल्या महिनाभरापासून गावातील सर्वसामान्यजनतेची पूर्ण कामे होत नाही व घरकुलचा विषय असेल किव्हा गावातील विकासकामांचा विषय असेल ही सर्व कामे खोळंबली असून या गावात तात्काळ कायमस्वरूपी ग्रामसेवक द्यावा असे अन्यथा सोमवार दिनांक १८ रोजी पंचायत समितीसमोर आंदोलन करणार असल्याचे निवेदन शेख एजाज यांनी दिले आहे यावेळी पत्रकार सतीश सोनवणे,पत्रकार सतीश मुजमुळे, मोहम्मद शेख,अलीम शेख, अफसर शेख, सुलतान शेख उपस्थित होते.

# स्वत : ची ओळख निर्माण करा, शरद पवारांचे फोटो का वापरतात?

## सर्वोच्च न्यायालयाने अजित पवारांना फटकारले




### न्यायालय काय म्हणाले

शरद पवार गटाकडे वेगळं चिन्ह आहे, तर अजित पवार गटही वेगळं चिन्ह घेऊन निवडणूक का लढवत नाही? जेणेकरून न्यायालयाच्या निकालाचा कोणताही परिणाम तुमच्यावर होणार नाही आणि तुमचं काम तुम्हाला विनासायास करता येईल. या सल्ल्यावर तुम्ही विचार करा, असेही न्यायालयाने नमूद केले.

### घडय़ाळाऐवजी दुसऱ्या चिन्हाचा विचार करा

तुम्ही घडय़ाळ चिन्हाचा वापर न करता दुसऱ्या कुठल्या तरी चिन्हाचा वापर करा, असा सल्ला आम्ही तुम्हाला देत आहोत. निवडणूक आयोगाच्या आदेशाविरोधात न्यायालयासमोर याचिका आलेली आहे. जर आम्ही आयोगाचा निकाल रद्दबातल ठरवला आणि ऐन निवडणुकीच्या मध्यावर आमचा निकाल आला तर तुम्ही काय कराल, असा प्रश्न न्यायालयाने अजित पवार गटाला केला.

### न्यायालयात काय घडले

तुम्ही त्यांचे फोटो का वापरत आहात? जर तुम्हाला स्वतःवर विश्वास आहे, तर मग तुमचे स्वतःचे फोटो वापरा, असे न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले. त्यावर अजित पवार गटाकडून युक्तिवाद करणारे ज्येष्ठ वकील मनिंदर सिंग यांनी आमच्या पक्षाकडून त्यांचे फोटो वापरले जात नाहीत. काही त्रयस्थ सदस्यांनी कदाचित वापरला असावा. कार्यकर्त्यांकडून सोशल मीडियावर टाकल्या जाणाऱ्या सर्व पोस्टवर नियंत्रण ठेवणं अशक्य असल्याचे सांगितले.

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये दोन गट झाल्यावरही राजकीय फायद्यासाठी शरद पवारांचे नाव आणि फोटो वापरणाऱ्या अजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयाने आज चांगलेच फटकारले. आता तुम्ही दोन स्वतंत्र गट आहात. त्यामुळे तुम्ही स्वतःची ओळख निर्माण करा, शरद पवारांचा फोटो का वापरता? यापुढे तुमच्या प्रचारासाठी त्याचा वापर करणार नाही अशी लेखी हमी द्या, असे न्यायालयाने बजावले. यावर शनिवारी आम्ही प्रतिज्ञापत्र सादर करू, असे अजित पवार गटाकडून स्पष्ट करण्यात आले. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने घडय़ाळ या निवडणूक चिन्हाऐवजी दुसऱ्या पर्यायाचाही विचार करा, असेही सुचवले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ मार्च रोजी होणार आहे.

राष्ट्रवादीतील फुटीनंतर पेंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हे नाव आणि घडय़ाळ चिन्ह अजित पवार गटाला दिले आहे. या निर्णयाविरोधात शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी पक्षाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यावर न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या वेळी युक्तिवाद करताना ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी अजित पवार गटाकडून स्वतःच्या प्रचारासाठी बॅनर्सवर शरद पवारांचे फोटो आणि नावाचाही गैरवापर करण्यात येत असल्याकडे लक्ष वेधले. या वेळी सिंघवी यांनी छगन भुजबळ यांचे एक वक्तव्यही न्यायालयासमोर वाचून दाखवत मतदारांना आकर्षित करण्यासाठी कशा प्रकारे शरद पवारांचा फोटो व घडय़ाळ चिन्हाचा वापर होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. याची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने स्वतःच्या प्रचारासाठी बॅनर्सवर शरद पवारांच्या फोटोचा वापर करू नका, असे निर्देशच अजित पवार गटाला दिले.

## जिव्हाळा वृद्धिंगत करणारी इफ्तार पार्टी संपन्न



परळी / शेख मुदस्सिर । दिव्य न्युज

इस्लाम धर्मात पवित्र रमजान महिण्याला महत्व प्राप्त आहे. या महिन्यात सर्वच मुस्लिम बाधंवाना रोजा फर्ज सक्तिचे असतात, लहानपासून मोठ्यांपर्यंत या महिन्यात रोजा धरत आहे. परळी येथील सादिया ऑटोमोबाईल येथे रोजा इफ्तार करतांना सलाउदीन मामु, बागवान हाफिज भाई,सत्तार भाई, बिलाल भाई, इरफान भाई, अबुजर भाई मेकानीक, मझर भाई मेकानीक व आदि उपस्थित होते

## किरकोळ कारणावरुन तरुणांस हाणामारी; धारूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

धारूर /दिव्य न्युज

किरकोळ कारणावरून तरुणांस बेदम मारहाण झाल्याचे घटना धारूर शहरात आडस रोड सपना बिअर बार समोर घडली आहे.याप्रकरणी तिघा विरोधात धारूर पोलिसांत तक्रार देण्यात आली आहे.सविस्तर माहिती अशी की अभिनव फावडे हा होंडा शोरुम मधुन बँकेच्या कामा निमित स्कुटीवर जात असताना सपना बिअर बार आडस रोड समोर अचानक रोहित विष्णु धोंगडे ,अभि बंडू सोळंके,मोटार सायकलवर येऊन अभिनव फावडे यांना हाणमार केली आहे. सपना बिअरबार आडस रोड समोर आचानक अभि बडू सोळुंके , रोहित धोंगडे यांनी अभिनव फावडे मोटार सायकलवर येत असल्याचे पाहुन ते दोघे येवुन हातात लाकडी दांडे घेवुन माझ्या हातावर पाठीवर



खुब्यावर मारहान केली व मुक्का मार दिला व डावा हातावर मारून हात फैक्चर करुन दुखापत केली व पळुन गेले आहे. रोहित विष्णु धोंगडे अभि बंडु सोळुंके ,अक्षय विष्णु धोंगडे यांच्या विरूद्ध धारूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे.आत्तापर्यंत आरोपी अटक न झाल्याने पोलीस प्रशासनाने तत्काळ आरोपींना अटक करण्याची मागणी केली जात आहे.

## सत्ताधारी व्हा ! हा संदेश मान्यवर कांशीरामजी यांनी बहुजन समाजाला दिला- नितीन ढाकणे

परळी/दिव्य न्युज

सत्ताधारी व्हा आणि आपले प्रश्न सोडवा हा मोलाचा संदेश बहुजन समाज पार्टीचे संस्थापक बहुजन नायक काशीराम यांनी बहुजन समाजाला दिला असे प्रतिपादन अतुल्य महाराष्ट्राचे संपादक नितीन ढाकणे यांनी केले .ते कांशीराम यांच्या ९० व्या जयंतीच्या निमित्ताने पत्रकार भवन येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.



लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे आज दिनांक १५ मार्च रोजी कांशीराम यांची जयंती साजरी करण्यात आली .या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी युवा संपादक नितीन ढाकणे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बसपाचे ज्येष्ठ नेते एडवोकेट डी एल उजगरे होते . पुढे बोलताना नितीन ढाकणे म्हणाले की काशीराम यांनी पंधरा विरुद्ध पंचाऐशी हा सिद्धांत मांडला. व बहुजन समाज सत्ताधारी होऊ शकतो हे दाखवून दिले. यावेळी बाबासाहेबांचे जाती व्यवस्थेचे निर्मूलन पुस्तक कांशीराम यांच्यासाठी मार्गदर्शक ठरल्याचे सांगितले.यावेळी डी.एल. उजगरे बोलताना यांच्या विषयी अनेक आठवणींना उजाळा दिला तसेच औरंगाबाद येथील जाहीर सभेत कांशीराम यांनी जवळ घेऊन कौतुकाची थाप मारली असे हे सांगितले. या कार्यक्रमास जेष्ठ पत्रकार रानबा गायकवाड ,प्रा .दशरथ रोडे ,दैनिक लोकमत समाचार चे अफसर सय्यद, बसपाचे नागसेन सोनवणे ,एडवोकेट बुद्धभूषण उजगरे, एस.के.गीते आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक फुले -आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे यांनी केले .तर आभार प्रदर्शन रानबा गायकवाड यांनी केले.

## नांदेड-पनवेल गाडीच्या बोगींची संख्या वाढवून परळी मार्गे ईतर ठिकाणी रेल्वे सुरू करण्याची महाव्यवस्थापकाकडे मागणी-जी.एस.सौंदळे

परळी / शेख मुदस्सिर । दिव्य न्युज

परळी मार्गे पुणे- पनवेल जाणा-या नांदेड एक्सप्रेस रेल्वे गाडीच्या प्रवाशी व स्लीपर तसेच ए.सी.बोगींची संख्या तात्काळ वाढवून या रेल्वेने दाटीवाटीने प्रवास करणा-या प्रवाशांची गैरसोय तात्काळ दुर करून परळी मार्गे पुणे,मुंबई,नागपुर,तिरूपती,अयोध्या,वाराणसी,गोवा व ईतर ठिकाणी रेल्वे सुरू करण्याची मागणी दक्षिण मध्य रेल्वे विभागाचे महाव्यवस्थापक श्री.अरूणकुमार जैन परळी रेल्वे स्थानक येथे तपासणीनिमित्त गुरूवार दि.१४ मार्च रोजी आले असताना रेल्वे प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष जी.एस.सौंदळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व प्रवाशांच्यावतीने करण्यात आली. नांदेड-पनवेल रेल्वेगाडी च्या बोगी वाढवण्याच्या मागणीसह प्रवासी जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने काही महत्वपूर्ण



मागण्या निवेदनात करण्यात आल्या यामध्ये १)मछलीपट्टणम -बीदर, सिकंद्राबाद-बीदर इंटरसिटी,यशवंतपुर-बीदर एक्सप्रेस,पाटणा-पूर्णा,रायचूर-परभणी रेल्वे परळी-वैजनाथ पर्यंत त्वरीत विस्तारीत करावी. २) मौजे अंबलटेक येथे रेल्वे क्रॉसिंग साठी नवीन स्थानक बांधणे. ३) 'पूर्णा-परळी' रेल्वे परत जाताना बहुअंशी रिकामीच असते त्या ऐवजी ती लातूर- धाराशिव किंवा उदगीर-बीदर पर्यंत विस्तारित करावी. ४) क्रॉसिंगच्या निमित्ताने घाटनांदूर,वडगाव (निळा) इत्यादी स्टेशन वर विविध गाड्या विनाकारण अधिक वेळ खोळंबून ठेवू नयेत यासह ईतर मागण्या करण्यात आल्या यावेळी नगरसेवक चेतन सौंदळे,अनिल अष्टेकर,विकास हालगे,सौ.सुचिता पोखरकर,मानवत रेल्वे प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष के.डी.वर्मा,प्रकाशसिंह तुसाम,गोपाळ अघाव,कैलास तांदळे,अनिरूध्द जोशी,सुनील आदोडे,रमाकांत बुरांडे,श्रीधर गुट्टे आदिंची उपस्थिती होती.

## अलहुदा उर्दू प्राथमिक शाळा बीड येथे बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न

बीड/ दिव्य न्युज

अलहुदा उर्दू प्राथमिक शाळेत घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमात हाजी अखलाक, हाजी शेख जुबैर, शाहेद अली खान व प्राध्यापक डॉ. फरह नहरी मॅडम हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना ट्रॉफी व पदक प्रदान करण्यात आले.




अधिक माहिती अशी की, दरवर्षीप्रमाणे यावर्षीही अलहुदा उर्दू प्राथमिक शाळेत पहिली ते सातवी पर्यंत वार्षिक खेळ स्पर्धा घेण्यात आली होती.मिर्झा शारेख बेग आणि शेख परवेज अहेमद तसेच इतर शिक्षकांयांच्या सहाय्याने वार्षिक क्रीडा स्पर्धा यशस्वी संपन्न झाली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यासाठी कार्यक्रम घेण्यात आले .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद कैसर अली सरांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पोर्टस इन्चार्ज कादरी परवेज सरांनी प्रस्तुत केले. मिर्झा शारेख बेग सरांनी बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी पार पाडली. बक्षीस वितरण कार्यक्रमात वर्ग पहिली ते सातवी पर्यंत खेळ स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या मुलांना आणि मुलींना प्रथम व द्वितीय ट्रॉफी प्रदान करण्यात आलेल्या. मुलींसाठी खो-खो, व मुलांसाठी कबड्डी टीम गेम घेण्यात आला होता.संघ स्पर्धेत प्रथम संघाला व दुतीय संघाला पदक प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी चांगले गुण कसे मिळवता येईल यासंबंधी आपले विचार मांडले. प्रत्येक मनुष्यात खेळाडू वृत्ती असणे आजच्या काळाची गरज आहे. खेळात जिंकण्यापेक्षा स्पर्धेत भाग घेणे, उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करणे, महत्त्वाचा आहे, ही भावना प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचा समारोप शाळेच्या मुख्याध्यापकांच्या आभारप्रदर्शन वर झाले.

## मनोज जरांगे पाटील यांना दासखेडकरांचा पाठिंबा,बीड लोकसभेसाठी दिले दोन उमेदवार




पाटोदा / दिव्य न्युज

मराठा योध्दा मा.मनोज जंरागे पाटील यांनी संगे-सोयऱ्यांची अमलबजावणी करा नसता लोकसभेच्या निवडणुकीत प्रत्येक गावातून खासदार उभे करण्याचे शासनाला इशारा दिला आहे. त्या अनुषंगाने पाटोदा तालुक्यातील दासखेड या गावातील सकल मराठा समाजाच्या वतीने एकमताने ठराव घेत श्री.सुंदराव खंडेराव कोकाटे व नानासाहेब एकनाथ वाघिरे असे दोन उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणापत्र मिळल्या शिवाय व संगे-सोयरेच्या अध्यादेशाची अंमलबजावणी केल्याशिवाय मराठा समाजाने कुठल्याही राजकीय पक्षाच्या स्टेजवर अथवा पुढार्यां बरोबर जाऊ नये. समाजातील व्यक्ती ने कुठल्याही राजकीय पक्षाशी बुथ एजंट बन नये. किंवा प्रचारात सहभागी व्होउ नये असा एक मताने ठराव संमत करण्यात आला आहे. तसेच मराठा आंदोलक बांधवावरील दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे मागे घेणे तसेच कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी ची तालुका व जिल्हा कमेटी यांनी कामाला गती देणे समाजातील विविध घटकांच्या समस्या सोडविण्यासाठी तालुका कमेटी निर्माण करणं विनामूल्य काम करणाऱ्या वकील संघाची कमेटी करणे व मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली एकजुटीने काम करणे असा ठराव संमत करण्यात आला या वेळी गावातील मराठा समाजातील विविध सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी.गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## कुरैश कॉन्फरन्स स्थापना दिनाचे राष्ट्रीय अधिवेशन दिल्लीत संपन्न

### दिल्लीत अनेक राज्यांतील लोक जमले, बंधुभावाच्या मुद्द्यावर लक्ष वेधण्यात आले

दिल्ली । वृत्तसंस्था

इंडिया इस्लामिक कल्चर सेंटर दिल्लीच्या बी. एस. कुरेशी कॉन्फरन्स नोंदणीकृत राष्ट्रीय अधिवेशन व स्थापना दिवस अब्दुररहमान सभागृहात पूर्ण उत्साहात व थाटामाटात साजरा करण्यात आला. सकाळी १० वाजता कारी हुरजाफा आणि दानिश कुरेशी सुवर्णपदक विजेता नैता रसूल यांच्या पठणाने कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष सनोबर अली कुरेशी अधिवक्ता सर्वोच्च न्यायालय होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कासगी मेरठ येथील शेखुल हदीस मुफ्ती खुशिद साहब आणि बीदर येथील शाहीन ग्रुप ऑफ स्कूलचे संचालक अब्दुल कादिर साहब हे उपस्थित होते. ज्याने कुरेश समाजातील १०० मुलांना डॉक्टर बनवण्याचे वचन दिले होते. आणि तुम्ही आम्हाला इमारत द्या आम्ही तुम्हाला शिक्षक देऊ असे सांगितले. मुफ्ती खुशिद म्हणाले की, फलाह आणि बेहबुदचे काम एखाद्याच्या टोळीला मदत करणे हे कुराण आणि हदीसने सिद्ध होते. ते म्हणाले की, जकातच्या माध्यमातून काही त्रस्त लोकांना उठून श्रीमंत लोकांच्या बरोबरीचे व्हायचे आहे. ते म्हणाले की २०२४ मध्ये २०० लोक जकात घेणार असतील तर २०२५ मध्ये १०० उरले पाहिजेत. मौलाना तौकीर राजा खान बरेलवी म्हणाले की, कुरेश समाजातील विवाह सुलभ करण्याचे काम आशीर्वादासारखे आहे. ते म्हणाले, मी या कामाला मान्यता देतो व पाठिंबा देतो.संभल जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष व मसुदा समितीचे सदस्य डॉ.इफ्तेखार अहमद कुरेशी म्हणाले की, आपल्या भारत देशात ६ कोटी कुरेशी बांधव आहेत.

दिल्ली येथे कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते, देशाचे माजी केंद्रीय मंत्री, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस कमिटीचे विद्यमान महासचित (संघटन व प्रशासन), उथउ चे सदस्य आणि राजस्थानचे राज्यसभा खासदार श्री. मुकुलजी वासनिक साहेव यांची दिल्ली येथे भेट घेतली असता त्यांचा सत्कार करतांना मलकापूर शिवसेना (उ.बा. ठा.) वे उपशहर प्रमुख व कुरेश कॉन्फ्रेंस युथचे जिल्हा अध क्ष समद भाई कुरेशी. जे परिधान करून सर्वोच्च न्यायालयाने अँड उ च्च न्यायालयांमध्ये कायदेशीर समितीची स्थापना आसन निकाह की कोमीडिया, करिअर समुपदेशन, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन, व्यापार



उत्पादन आणि परवाना, मासिके, वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक चॅनेल, जकात निधीसाठी सिंगल विंडो सिस्टीमची अंमलबजावणी यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश आहे. प्रधान सरचिटणीस आशिकीन कुरेशी यांनी वार्षिक अहवाल सादर करून नियुक्त्यांबाबत सविस्तर माहिती दिली. तर राष्ट्रीय खजिनदार तनजीम कुरेशी यांनी उत्पन्न व सर्वसाधारण लेखाजोखा मांडला. राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष सलीम अहमद कुरेशी म्हणाले की, स्वातंत्र्यापासून आजतागायत कुरेशी समाज गाढ झोपेत आहे. सरकार आणि सत्तेकडून न्यायाची अपेक्षा करताना आपल्याला केवळ आपल्या समस्यांवर उपाय शोधण्याची गरज नाही तर आपले हक्क मिळवण्यासाठी संघटित होण्याची गरज आहे. अधिवक्ता शराफत हुसेन कुरेशी राष्ट्रीय सचिव यांनी मिशन व्हिजन आणि टार्गेट या विषयावर चर्चा केली.बचाय कुरेश भैय्या रशिदुद्दीन कुरेशी यांच्या सेवेचेही स्मरण करण्यात आले. राष्ट्रीय अध्यक्षांचा जोधपूर संघाने गौरव केला, कर्नाटकच्या अध्यक्षांनी पुरस्कार दिला तर कुरेश परिषदेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने त्यांना फखराई फुरेश पुरस्काराने सन्मानित केले. त्यांनी निजामाचे उदात्त काम केले, नजर दो हम केले आणि समितीने तेलंगणाचे अन्सारी जवळपास केले तर आदिंनी केले.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०